# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः06.04.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी,
2. गर्भाशयाच्या कर्करोगाच्या निदानासाठी दिल्लीच्या एम्समध्ये स्वदेशी प्रमाणित चाचण्यांना सुरुवात,
3. भारताला लवकरच संयुक्त राष्ट्राचं कायमस्वरूपी सदस्यत्व मिळेल, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस.जयशंकर यांचा विश्वास
4. भारताच्या औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग यावर्षी फेब्रुवारीमध्ये चार महिन्यांतील उच्चांकी 5 पूर्णांक 7 दशांश टक्क्यांवर
5. रामेश्वरम कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणी दोघा संशयितांना पश्चिम बंगालमध्ये अटक, आणि
6. प्रतिकूल चक्रीवादळाच्या परिस्थितीमुळे हवामान विभागाच्या वतीने महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या काही भागात केशरी बावटा जारी

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना काल निवडणूक आयोगानं जारी केली. या टप्प्यात 10 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेशातील 94 लोकसभा मतदार संघात निवडणूक होणार आहे. यामध्ये गुजरात मधील सर्व 26 जागा, कर्नाटकातील 14, महाराष्ट्रातील 11, उत्तरप्रदेशातील 10, मध्यप्रदेशातील 8, छत्तीसगड मध्ये 7, बिहार मध्ये 5, आसाम आणि पश्चिम बंगाल मध्ये प्रत्येकी 4, गोवा, दादरा, नगर हवेली, दमन आणि दिव यामध्ये प्रत्येकी 2 आणि जम्मू काश्मीर मधील एका जागेसाठी मतदान होणार आहे. मध्यप्रदेशातील बेतुल लोकसभा मतदार संघात दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान होणार होत, पण तिथल्या बहुजन समाज पक्षाच्या उमेदवाराच्या निधनामुळे अधिसूचना रद्द करण्यात आली होती. आता तिसऱ्या टप्प्यात तिथ मतदान होणार असून त्याबाबतची अधिसूचना काल काढण्यात आली. या सर्व मतदारसंघात 19 एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील, तर 7 मे रोजी मतदान होईल.

**पहिला टप्पा उमेदवार**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान येत्या 19 एप्रिलला होणार असून त्या पार्श्वभूमीवर, विविध पक्षांच्या 1625 उमेदवारांनी भरलेले अर्ज वैध ठरले आहेत. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटीक रिफॉम या संस्थेने 1625 उमेदवारांपैकी 1618 उमेदवारांच्या गुन्हेगारी आणि आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून अहवाल तयार केला आहे. त्यानुसार यातील 16 टक्के म्हणजेच 252 उमेदवारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असून, त्यापैकी 10 टक्के म्हणजेच 161 उमेदवारांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी 35 जणांवर द्वेष मूलक भाषणे दिल्याबद्दल तर 18 जणांवर महिलांसंदर्भात गुन्हे दाखल आहेत. 1618८ उमेदवारांपैकी 28 टक्के म्हणजे 450 उमेदवार कोट्याधीश असून त्यांची सरासरी मालमत्ता सुमारे साडेचार कोटी रुपये इतकी आहे. यापैकी छीन्दवाडा इथले उमेदवार नकुल नाथ यांची संपत्ती 716 कोटी रुपये आहे. नागरिकांना मतदान करताना या माहितीचा उपयोग व्हावा हा या अहवालामागचा उद्देश आहे,अस संघटनेने म्हटलं आहे.

**एम्स सर्विकल कॅन्सर**

दिल्लीच्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस म्हणजेच एम्स नं, गर्भाशयाच्या कर्करोगाच्या निदानासाठी स्वदेशी प्रमाणित एचपीव्ही चाचणीच्या टप्प्याला सुरूवात केली. एम्सचे संचालक एम. श्रीनिवास यांच्या उपस्थितीत काल ही

सुरुवात केली. या प्रकल्पाच्या प्रमुख डॉ. नीरजा भाटला यांनी प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. सद्यस्थितीत एचपीव्ही चाचण्या महाग असून त्यासाठी विस्तारीत प्रयोगशाळांची आवश्यकता आहे. त्यामुळे कमी किमतीत, उपचाराच्या ठिकाणीच चाचणी विकसित आणि प्रमाणित करून देणं ही तातडीची गरज आहे. त्यामुळे भारतात प्रामुख्याने कर्करोगासाठी कारणीभूत ठरणाऱ्या एचपीव्ही जिनोटाईप्सचं निदान करता येऊ शकेल.

त्या पुढे म्हणाल्या की, या दृष्टीकोनातून, जैवतंत्रज्ञान विभागाअंतर्गत जैवतंत्रज्ञान उद्योग संशोधन सहकार्य कौन्सिल डीबीटी- बीआयआरएसी(बीरॅक) आणि जागतिक आरोग्य संस्था म्हणजेच डब्ल्यूएचओ च्या आंतरराष्ट्रीय कर्करोग संशोधन संस्था यांच्या सहकार्यानं बहुकेंद्रीय अभ्यास सुरू करण्यात आला आहे. या चाचण्या दिल्लीत एम्स मध्ये, नॉएडात एनआयसीपीआर आणि मुंबईत एनआयआरआरसीएच इथं करण्यात येतील. या ऐतिहासिक प्रकल्पामुळे गर्भाशयाच्या कर्करोगाच्या नैदानिक चाचणीसाठी भारतीय बनावटीच्या चाचण्याचे प्रमाणीकरण आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांनुसार होऊ शकेल.

जगभरात गर्भाशय मुखाचा कर्करोग हा स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या रोगांतला चौथा सामान्य कर्करोग आहे. भारतीय स्त्रियांमध्ये हा दुसरा क्रमाकांचा आजार आहे. ग्लोबोकॅन 2022 या अहवालानुसार, जगभरात 6 लाख 63 हजार महिलांना गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगाचे निदान झाले तर साधारण 3 लाख 48 हजार महिलांचा या आजाराने मृत्यू झाला. भारतात वर्षाला अंदाजे एक लाख 27 हजार नवीन रुग्ण आणि जवळपास 80 हजार मृत्यू होतात. हा कर्करोग टाळता येऊ शकतो आणि कर्करोगपूर्व किंवा प्रारंभिक अवस्थेत आढळल्यास त्यावर उपचार केले जाऊ शकतात. सध्या देशात यासंबंधी जनजागृती करण्यात येत असून 35 ते 45 वयोगटातील 70 टक्के महिलांची तपासणी करणे आणि 2030 पर्यंत 90 टक्के मुलींना एचपीव्ही विरूद्ध लसीकरण करणे आवश्यक आहे.

**<u>जयशंकर</u>**

कोविडच्या काळात भारताने शंभराहून अधिक देशांना कोविडची प्रतिबंधक लस पुरविली; त्यामुळे कोविडनंतर भारताकडे पाहण्याचा जगातील अनेक देशांचा दृष्टीकोन बदलला. जगभरातील जनता आता भारताच्यासोबत आहे. त्यामुळे भारताला लवकरात लवकर संयुक्त राष्ट्राचं कायमस्वरूपी सदस्यत्व मिळेल, असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर यांनी काल पुण्यात व्यक्त केला. समर्थ युवा फाऊंडेशन आणि युवा स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. विजय चौथाईवाले यांनी एस. जयशंकर यांच्याशी, भारताच्या जागतिक उदयाचा प्रवास या विषयावर संवाद साधला. युक्रेनहून भारतात परतलेल्या काही विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी  यावेळी जयशंकर यांचा विशेष सत्कार केला. गेल्या चार वर्षांत भारताची संस्कृती, वारसा याबद्दल देशातील नागरिकांमध्ये स्वयंजागृती झाली, असं जयशंकर म्हणाले. देशातील बुद्धिमत्तेला अधिकाधिक संधी देण्यासाठी पायाभूत सुविधा, स्टार्ट अप, आणि व्यवसायानुकूल वातावरण तयार होत आहे, असं सांगून भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेत गुंतवणूक करावी लागेल, असं प्रतिपादन जयशंकर यांनी केलं.

**<u>अमेरिका इस्रायल इराण</u>**

एप्रिलच्या सुरूवातीला इराणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर इस्रायलनं केलेल्या जीवघेण्या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी इराण लवकर इस्रायलवर हल्ला करेल, अशी शक्यता अमेरिकेचे राष्ट्रपती जो बायडन यांनी व्यक्त केली आहे. प्रादेशिक युद्धाची व्याप्ती वाढण्याची भीती असून अमेरिकाही अधिक सतर्क झाली आहे. बायडन म्हणाले की, अमेरिका इस्रायलला संरक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे आणि इराणचा हेतू यशस्वी होणार नाही. दरम्यान, अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्ससह अन्य देशांना इराणकडून धोका संभवत असल्यानं इस्रायलमधल्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवी प्रवास मार्गदर्शक तत्व जारी केली आहेत. याच दरम्यान हिजबुल्लाहनं लेबनॉनमधून इस्रायलच्या दिशेनं डझनभर रॉकेटचा मारा केला. इस्रायलच्या सुरक्षा दलाच्या प्रवक्त्यानं दिलेल्या माहितीनुसार, 40 क्षेपणास्त्र आणि दोन स्फोटक ड्रोनचा यात समावेश होता. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचंही या प्रवक्त्यानं सांगितलं.

**औद्योगिक उत्पादन**

भारताच्या औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग, मुख्यत्वे खाण क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे यावर्षी फेब्रुवारीमध्ये चार महिन्यांच्या उच्चांकी, 5.7 टक्क्यांवर पोहोचला. औद्योगिक उत्पादन निर्देशांकानुसार कारखाना क्षेत्रातील उत्पादन वाढ गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये सहा टक्के होती. ऑक्टोबर 2023 मध्ये IIP चा उच्चांक 11.9 टक्के नोंदवला गेला होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आर्थिक वर्षाच्या एप्रिल-फेब्रुवारी कालावधीत IIP मधील वाढ 5.9 टक्क्यांवर पोहोचली. ताज्या आकडेवारीनुसार, खाण उत्पादनात फेब्रुवारीमध्ये आठ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, मागील वर्षी हा दर 4.8 होता.

**मुर्मू-शुभेच्छा**

देशातल्या विविध भागात आज आणि उद्या बैशाखी, विशू, बिशब, बोहाग बिहू, पॉयला बॉयशाख, वैशाखादी आणि पुथान्डू सण साजरे होताहेत. त्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपतींनी दिलेल्या संदेशात, देशभरातल्या शेतकऱ्यांच्या कष्टांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. या सर्व सणांमुळे प्रत्येकाच्या आयुष्यात समृद्धी आणि शांतता नांदो अशी कामना व्यक्त केली आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनाही देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची कलाकुसर विणणारे हे सण देशभरात विविध नावांनी साजरे केले जातात ज्यामुळे विविधतेतील एकतेची भावना वृद्धींगत होते, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**एनआयए अटक**

राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल मोसाविर हुसेन साजिब आणि अब्दुल मथिन अहमद ताहा या दोघा संशयित आरोपींना पश्चिम बंगालच्या पूर्व मेदिनीपूर इथून अटक केली. हे दोघे स्थानिक रामेश्वरम कॅफे बॉम्बस्फोटाशी संबंधित आरोपी आहेत. कोलकता इथं एनआयएच्या विशेष न्यायालयानं या दोघांना स्थानांतरण कोठडी सुनावली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघांना आज बंगळुरू इथं नेण्यात येईल. पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातल्या एका हॉटेलमधून या दोघांना ताब्यात घेण्यात आलं. एनआयए नं दिलेल्या माहितीनुसार, बंगळुरूमध्ये एक मार्चला झालेल्या स्फोटप्रकरणी अटक केलेल्या मोझम्मर शरीफ याला अटक केल्यानंतर त्याच्याकडून तपास यंत्रणेला या दोघांची माहिती मिळाली. या दोन्ही संशयितांवर दहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे.

**हवामान**

भारतीय हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजानुसार महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश राज्यांच्या काही भागात केशरी बावटा जारी करण्यात आला आहे. प्रतिकूल चक्रीवादळाच्या परिस्थितीमुळे या राज्यात मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. येत्या तीन दिवसात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यांच्या काही भागात विजांसह आणि ताशी चाळीस किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील चार दिवस दक्षिण भारतात आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू मध्ये तर पुढील सात दिवस तेलंगणा, केरळ, कर्नाटक आणि पॉडेचरी मध्ये अशीच हवामान स्थिती राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.